दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. २९ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - २१४ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, शुक्लपक्ष, त्रयोदशी संध्याकाळी ७-५२ पर्यंत नंतर चतुर्दशी तिथी, दिवस नक्षत्र– हस्त रात्री १२-१६ पर्यंत नंतर चित्रा चंद्र रास- कन्या, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

### पुणेकरांच्या तहानेत वाढ


**पुणे**: गेल्या तीन वर्षांपासून शहराचे वाढते तापमान, वाढलेल्या नागरिकांमुळे पाण्याची वाढलेली मागणी आणि महापालिकेस शहराला पाणीपुरवठा करताना येणाऱ्या अपयशामुळे पुणेकरांना आपली तहान भागविण्यासाठी वाढती टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. गेल्या दोन वर्षांपासून शहरात पाण्याच्या टँकरची मागणी वर्षाला ५० हजार फेऱ्यांनी वाढली आहे. एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ अखेर ही संख्या तब्बल ५ लाख १७ हजारांवर गेली आहे.

## ओपेकमधून बाहेर पडण्याचा यूएईचा निर्णय; आखाती प्रदेशातील तणाव कारणीभूत

# तेलाच्या बाजारात मोठी खळबळ!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : कच्च्या तेलाच्या जागतिक बाजारात एक अत्यंत मोठी आणि धक्कादायक घडामोड घडली आहे. संयुक्त अरब अमिराती (यूएई) ने १ मे पासून 'ओपेक' आणि 'ओपेक प्लस' या तेल उत्पादक देशांच्या शक्तिशाली संघटनेतून बाहेर पडण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या अनपेक्षित निर्णयामुळे जागतिक ऊर्जा बाजारात मोठा भूकंप आला असून, सुरुवातीला कच्च्या तेलाच्या किमती आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. 'ब्लूमबर्ग' आणि इतर आंतरराष्ट्रीय माध्यमांच्या वृत्तानुसार, या घोषणेनंतर 'ब्रेंट




क्रूड' तेलाचे दर प्रति बॅरल १११ डॉलर्सच्या पुढे गेले आहेत.

सध्या इराण युद्धाच्या परिस्थितीमुळे आणि जगातील महत्त्वाचा तेल वाहतूक मार्ग असलेला 'होर्मुझची सामुद्रधुनी' बंद असल्यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्याला आधीच मोठा फटका बसला आहे. अशातच यूएईने आपल्या 'राष्ट्रीय हिताचे' आणि धोरणात्मक स्वातंत्र्याचे कारण देत या संघटनेतून बाहेर पडण्याची घोषणा केली.

यूएईचे ऊर्जामंत्री सुहैल अल मजरूई यांनी स्पष्ट केले की, हा निर्णय देशाच्या भविष्यातील ऊर्जा धोरणांचा आणि वाढीव उत्पादन क्षमतेचा विचार करून घेण्यात आला आहे. 'ओपेक'च्या उत्पादन कपातीच्या नियमांमुळे यूएईला आपल्या पूर्ण क्षमतेने तेल उत्पादन करता येत नव्हते. आता या निर्बंधांमधून मुक्त झाल्यावर यूएई स्वतःच्या इच्छेनुसार तेलाचे उत्पादन आणि निर्यात वाढवू शकणार आहे. यामुळे 'ओपेक'चा प्रमुख देश असलेल्या सौदी अरेबियाला आणि त्यांच्या मक्तेदारीला मोठा धक्का बसला आहे.

या निर्णयामुळे ओपेक च्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे काही तज्ज्ञांचे मत आहे. अमिराती हा संघटनेतील शिस्तबद्ध आणि उत्पादन नियंत्रण पाळणारा महत्त्वाचा सदस्य मानला जात होता. त्याच्या बाहेर पडण्यामुळे संघटनेची उत्पादन क्षमता सुमारे १५ टक्क्यांनी कमी होऊ शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. परिणामी, सौदी अरेबियावर बाजारपेठेतील संतुलन राखण्याची मोठी जबाबदारी येणार आहे.

सध्या अमिराती दररोज सुमारे २.९ दशलक्ष बॅरल तेल उत्पादन करते. ओपेकच्या बंधनातून मुक्त झाल्यानंतर देशाला उत्पादन वाढवण्याची अधिक मोकळीक मिळणार आहे. कमी खर्चिक आणि तुलनेने कमी कार्बन उत्सर्जन असलेल्या साठ्यांचा अधिक वेगाने वापर करून जागतिक बाजारात स्पर्धात्मकता वाढवण्याचा अमिरातीचा प्रयत्न असेल. १९६० मध्ये इराण, इराक, कुवेत, सौदी अरेबिया आणि व्हेनेझुएला यांनी स्थापन केलेल्या या संघटनेसमोर आता नवे आव्हान उभे राहिले आहे. पुढे इतर सदस्य देशही अमिरातीच्या पावलावर पाऊल ठेवतात का, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

## पेट्रोडॉलरला धक्का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दुबई** : संयुक्त अरब अमिरातीने २८ एप्रिल रोजी ओपेक आणि ओपेक+ मधून बाहेर पडण्याचा ऐतिहासिक निर्णय जाहीर करत जागतिक ऊर्जा आणि आर्थिक व्यवस्थेत मोठी हालचाल निर्माण केली आहे. १ मेपासून लागू होणाऱ्या या निर्णयाचे परिणाम केवळ तेल बाजारापुरते मर्यादित न राहता डॉलरच्या वर्चस्वापासून भारत-यूएई व्यापारापर्यंत अनेक स्तरांवर जाणवण्याची शक्यता आहे.

यूएईला आपल्या तेल उत्पादनात वाढ करण्याचा मार्ग खुला झाला आहे. यामुळे जागतिक बाजारात स्पर्धा वाढण्याची शक्यता आहे. यूएईच्या या निर्णयामुळे अमेरिकन डॉलरच्या वर्चस्वावर ज्याला 'पेट्रोडॉलर' व्यवस्था म्हटले जाते, दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो, अशी चर्चा सुरू झाली आहे. आतापर्यंत जागतिक तेल व्यवहार प्रामुख्याने डॉलरमध्ये होत असल्याने डॉलरचे आंतरराष्ट्रीय महत्त्व टिकून होते. मात्र आता यूएईसारख्या मोठ्या तेल उत्पादक देशाला व्यवहारासाठी पर्यायी चलने स्वीकारण्याची अधिक मोकळीक मिळणार आहे. विशेषतः चिनी युआन, भारतीय रुपया यांसारख्या चलनांमध्ये व्यवहार वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ब्रिक्स देशांमध्ये 'डी-डॉलरायझेशन'चा कल आधीपासून दिसत असून, हा निर्णय त्याला बळ देणारा आहे.

यूएईच्या निर्णयाचा सर्वाधिक सकारात्मक परिणाम भारतासाठी होऊ शकतो. भारत आणि यूएई यांच्यात आधीच स्थानिक चलनात व्यापारासाठी 'रुपी-दिरहाम' यंत्रणा कार्यान्वित आहे. या करारामुळे डॉलरवर अवलंबित्व कमी करून थेट व्यवहार शक्य झाले आहेत. गेल्या काही वर्षांत भारत-यूएई द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज डॉलरच्या पुढे गेला असून, ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढत आहे.

## सारांश वृत्त

### निलंबित अधिकाऱ्याचा जामीन अर्ज फेटाळला

**रांची** : झारखंड उच्च न्यायालयाने मंगळवारी निलंबित आयएएस अधिकारी विनय चौबे यांचा जामीन अर्ज फेटाळला. न्यायमूर्ती अनुभा रावत चौधरी यांच्या न्यायालयाने या याचिकेवर सविस्तर सुनावणी केल्यानंतर हा आदेश राखून ठेवला होता. हजारीबागचे उपायुक्त असताना मुख्यमंत्र्यांचे माजी सचिव चौबे यांनी या प्रकरणात जामिनासाठी उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला होता.

### बनावट प्रमाणपत्र देणाऱ्याला अटक

**फरीदाबाद** : वाहनांसाठी बनावट फिटनेस प्रमाणपत्र पुरवणाऱ्या टोळीशी संबंधित एका संशयिताला पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीला शहर न्यायालयात हजर केल्यानंतर पोलिसांनी त्याला दोन दिवसांची कोठडी मिळाली आहे. दिल्लीच्या सिव्हिल लाइन्स येथील रहिवासी आणि सुमारे १५ वाहनांचे मालक असलेल्या तक्रारदार वेदपाल यांनी पोलिसांना सांगितले की त्यांनी २०२३ मध्ये गुरुग्राममध्ये एक इनोव्हा कार खरेदी केली होती आणि ती एका ओळखीच्या पत्त्यावर नोंदविली होती.

### रशियाच्या चर्चा करून आनंद झाला

**मॉस्को** : इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अरागची यांनी सांगितले की, रशिया आणि इराण यांच्यातील सहकार्य वाढत आहे, कारण अमेरिकेबरोबर शांतता चर्चेच्या दुसर् या फेरीच्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी तेहरानला मॉस्कोच्या एकजुटीचे आणि समर्थनाचे स्वागत केले. सोमवारी सेंट पीटर्सबर्गमध्ये रशियाचे अध्यक्ष पुतीन यांची भेट घेतल्याने अरागची म्हणाले की, रशियाशी उच्च स्तरावर संवाद साधण्यात मला आनंद होत आहे.

## डिजिटल अरेस्ट प्रकरणात ९,४०० व्हॉट्सअॅप खात्यांवर बंदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : देशात वाढत्या 'डिजिटल अरेस्ट' प्रकारच्या सायबर फसवणुकीला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने कठोर पावले उचलली आहेत. जानेवारी पासून आतापर्यंत सायबर गुन्ह्यांत सहभागी असल्याचे आढळलेल्या ९,४०० व्हॉट्सअॅप खात्यांवर बंदी घालण्यात आली आहे. ही माहिती केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालय येथे सादर केली.

ही कारवाई इंडियन सायबरक्राईम कोऑर्डिनेशन सेंटर, दूरसंचार विभाग, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, तंत्रज्ञान कंपन्या आणि केंद्रीय अन्वेषण विभाग यांच्या समन्वयातून करण्यात आली आहे. गृह मंत्रालयाअंतर्गत कार्यरत असलेल्या आय४सी ने न्यायालयात सविस्तर अहवाल सादर केला असून, डिजिटल अरेस्टसारख्या ऑनलाइन फसवणूक प्रकरणांना आळा घालण्यासाठी बहुपातळी उपाययोजना सुरू असल्याचे त्यात नमूद करण्यात आले आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली आहे. न्यायालयाने डिजिटल अरेस्ट प्रकरणांतील पीडितांना नुकसानभरपाई देण्यासाठी संबंधित संस्थांना संयुक्त आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.

आय४सी, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि दूरसंचार विभाग यांनी व्यक्त केलेल्या चिंतेनंतर व्हॉटसअॅपने जानेवारी मध्ये विशेष तपास मोहीम सुरू केली.

## सुनिल कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे, प्रमोद जठार

# भाजपकडून विधानपरिषदेवर निष्ठावंतांना संधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : विधान परिषदेच्या नऊ नियमित जागा आणि एका पोटनिवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने अखेर आपल्या उमेदवारांची घोषणा केली असून, यामध्ये निष्ठावंत कार्यकर्त्यांना प्राधान्य देण्यात आले आहे. सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार यांच्या नावांवर मंगळवारी रात्री दिल्लीत शिक्कामोर्तब करण्यात आले. विशेष म्हणजे, राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या पोटनिवडणुकीच्या जागेवर पक्षाने अपेक्षेप्रमाणे प्रज्ञा सातव यांनाच पुन्हा संधी दिली आहे.



या निवडीतून भाजपने प्रस्थापित बड्या चेहऱ्यांऐवजी संघटनात्मक बांधणीत सक्रिय असलेल्या आणि ग्रामीण भागात पक्षाची पाळेमुळे घट्ट करणाऱ्या नेत्यांना विधानपरिषदेची दारे खुली करून दिली आहेत. सुरुवातीला कोअर कमिटीने पाठवलेली ३० नावांची यादी दिल्लीवरून परत आल्यानंतर १४ नावांची फेरयादी पाठवण्यात आली होती. यातून निवडलेल्या पाच नावांमध्ये प्रादेशिक आणि जातीय समीकरणांचा अचूक समतोल साधण्यात आला आहे. सुनील कर्जतकर आणि संजय भेंडे यांच्या निवडीतून पक्षाने संघटनात्मक बळकटीकरणावर भर दिला आहे. तसेच महिला मोर्चाच्या आक्रमक नेत्या माधवी नाईक, पश्चिम महाराष्ट्रातील विवेक कोल्हे आणि कोकणातील प्रमोद जठार यांच्या माध्यमातून संबंधित विभागांत भाजपची राजकीय ताकद बळकट करण्याचा प्रयत्न केला आहे.

अर्ज भरण्यासाठी अवघे दोन दिवस उरले असताना भाजपने आपले पत्ते उघड केले असले, तरी महायुतीमधील शिवसेना आणि अजित पवार गटाच्या कोट्यातील उमेदवारांची अधिकृत घोषणा अद्याप बाकी आहे. संख्याबळानुसार महायुतीला नऊ, तर महाविकास आघाडीला एक जागा मिळण्याची चिन्हे आहेत. महाविकास आघाडीकडे एका जागेचे संख्याबळ असल्याने तिथे कोणाची वर्णी लागते, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. भाजपने ३० एप्रिलच्या मुदतीपूर्वीच आपली नावे निश्चित करून इच्छुकांमधील संभाव्य नाराजी शमवण्याचा प्रयत्न केला आहे.

## हवाई संरक्षणाला मिळणार सुदर्शन चक्र

# चौथी एस-४०० प्रणाली रशियातून रवाना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : रशियाने भारतासाठी चौथी एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली रवाना केली असून, मे महिन्याच्या अखेरीस ती तैनात होण्याची शक्यता आहे. या प्रणालीमुळे भारताच्या हवाई सुरक्षेला आणखी बळ मिळणार आहे.

गेल्या वर्षीच्या पहलगाम हल्ल्यानंतर भारताने राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान एस-४०० प्रणालीने प्रभावी कामगिरी केल्याचे मानले जाते. त्या वेळी पाकिस्तानकडून होणारे ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले निष्प्रभ ठरवण्यात या प्रणालीची महत्त्वाची भूमिका होती. या पार्श्वभूमीवर आता आणखी एक प्रणाली भारतात दाखल होत असल्याने संरक्षण क्षमता अधिक मजबूत होणार आहे. रशियाकडून पाठवण्यात आलेली चौथी एस-४०० प्रणाली मे महिन्याच्या मध्यापर्यंत भारतीय बंदरात पोहोचण्याची शक्यता असून, त्यानंतर तिची तैनाती करण्यात येईल. यावर्षी नोव्हेंबरपर्यंत पाचवी प्रणालीही भारतात दाखल होण्याची अपेक्षा आहे.

भारताने २०१८ मध्ये रशियासोबत एस-४०० लाँग-रेंज सरफेस-टू-एअर मिसाइल प्रणालीसाठी सुमारे ५.५ अब्ज डॉलरचा करार केला होता. या कराराअंतर्गत एकूण पाच प्रणालींची खरेदी करण्यात येत आहे.

सध्या तीन प्रणाली भारतात कार्यरत असून, उर्वरित दोन लवकरच सेवेत दाखल होणार आहेत. एस-४०० प्रणाली सुमारे ४०० किलोमीटरपर्यंत लक्ष्य भेदण्याची क्षमता ठेवते. ती एकाच वेळी अनेक हवाई लक्ष्यांवर लक्ष ठेवून त्यांचा नाश करू शकते. त्यामुळे शत्रूच्या विमानांपासून, ड्रोनपासून आणि क्षेपणास्त्रांपासून संरक्षण मिळते. नवीन प्रणालीची तांत्रिक तपासणी पूर्ण झाली असून भारतीय हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी एप्रिल महिन्यात तिचे निरीक्षण केले होते. त्यानंतर ही प्रणाली भारताकडे रवाना करण्यात आली आहे.

ही प्रणाली राजस्थानमध्ये तैनात केली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे, ज्यामुळे पश्चिम सीमेवरील सुरक्षा अधिक मजबूत होईल. सध्या भारतात कार्यरत असलेल्या एस-४०० प्रणाली पंजाब, लडाख आणि सिलीगुडी कॉरिडॉर परिसरात तैनात आहेत. नवीन प्रणालींच्या समावेशामुळे देशाच्या संरक्षण कवचाची व्याप्ती आणखी वाढणार आहे.

### खा. बजरंग सोनवणे यांच्या गाडीला अपघात

**बीड** : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)चे खासदार बजरंग सोनवणे यांच्या कारला अपघात झाला असून, या घटनेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोनवणे यांचा ताफा बीडहून केजकडे जात असताना मस्साजोग येथील बसस्थानकाजवळ थांबला होता. त्याच वेळी मागून आलेल्या दुचाकीने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली. या धडकेत कारचे नुकसान झाले असून, काचा फुटल्या आहेत. तर दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळी नागरिकांची गर्दी जमली होती.

# पगारापेक्षा 'एआय'चा खर्च दुप्पट

## कर्मचारी परवडले, एआय नको अशी कंपन्यांची अवस्था

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : अनेक आघाडीच्या कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना नोकरीवरून कमी करून एआयवर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत. परंतु, एआयचा खर्च झपाट्याने वाढू लागल्याने "कर्मचारी परवडले, पण एआय नको" असे म्हणण्याची वेळ काही कंपन्यांवर येऊ लागली आहे.

एआय मॉडेल ट्रेन करणे आणि ते चालवणे आता इतके महाग झाले आहे की, अनेक कंपन्यांचे एआयवरील खर्च त्यांच्या मनुष्यबळाच्या खर्चालाही मागे टाकत आहेत. गार्टनरच्या अंदाजानुसार, २०२६ मध्ये जागतिक आयटी खर्च ६.३१ ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचण्याची शक्यता आहे, जो २०२५ च्या तुलनेत १३.५ टक्क्यांनी अधिक आहे. उबरचे प्रवीण नेपल्ली नागा यांनी सांगितले की, त्यांच्या कंपनीने २०२६ चे संपूर्ण एआय बजेट काही महिन्यांतच खर्च केले. यासाठी क्लॉडी कोडसारख्या कोडिंग टूल्सचा अतिवापर कारणीभूत ठरला. अमोस बार-जोसेफ यांनी सांगितले की, त्यांच्या केवळ चार जणांच्या टीमसाठी एआयचे एका महिन्याचे बिल १,१३,००० डॉलर्स (सुमारे १.०६ कोटी रुपये) इतके आले आहे. एनव्हिडियाचे व्हाइस प्रेसिडेंट ब्रायन कॅटानझारो यांच्या मते, त्यांच्या टीमसाठी कॉम्प्युटिंगचा खर्च आता कर्मचाऱ्यांच्या पगारापेक्षा जास्त झाला आहे.

एआयच्या वाढत्या खर्चाचा परिणाम आता सर्वसामान्य वापरकर्त्यांवरही दिसू लागला आहे. अँथ्रोपिकच्या युजर्सनी टोकन मर्यादा लवकर संपत असल्याची तक्रार केली आहे, त्यामुळे त्यांना पूर्ण सेवा वापरता येत नाही. यामुळे एक नवीन डिजिटल दरी निर्माण होत असल्याचे दिसते.

दरम्यान, खर्च कमी करण्यासाठी तंत्रज्ञान कंपन्या प्रयत्न करत आहेत.

## खासदार रामदास आठवले यांचे प्रतिपादन

# माता रमाईंच्या त्यागातूनच उभे राहिले डॉ. बाबासाहेबांचे कार्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर या संघर्ष, त्याग आणि समर्पणाची जिवंत प्रतिमा होत्या. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवमुक्तीच्या महान कार्याला खंबीर साथ दिली. त्यांच्या या नि:स्वार्थ त्यागामुळेच बाबासाहेबांचे विचार आणि कार्य अधिक बळकट झाले, असे प्रतिपादन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी येथील भीमसृष्टी परिसरात उभारण्यात येणाऱ्या 'त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर सृष्टी' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे



भूमिपूजन आठवले यांच्या हस्ते पार पडले. या सोहळ्याला डॉ. भीमराव आंबेडकर, महापौर रवी लांडगे यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आठवले यांनी आपल्या भाषणात बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी देशाला संविधान, समानता आणि स्वाभिमानाचा मार्ग दिला; परंतु त्या विचारांच्या पाठीशी उभी राहणारी शक्ती रमाईंच्या रूपाने होती. डॉ. भीमराव आंबेडकर यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पाचे कौतुक करताना सांगितले की, भीमसृष्टीसारख्या स्मारकांमुळे देशभरातून नागरिक येथे येतात. महापुरुषांच्या विचारांचा प्रसार आणि पुढील पिढ्यांना प्रेरणा देण्यासाठी अशा स्मारकांची उभारणी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. महापौर रवी लांडगे यांनी सांगितले की, या प्रकल्पासाठी कार्यकर्त्यांनी तब्बल १५ वर्षे सातत्याने लढा दिला. सुमारे २७ कोटी रुपये खर्चून उभारला जाणारा हा प्रकल्प पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानाचा ठरेल. "रमाईंच्या त्यागाशिवाय बाबासाहेबांचे कार्य इतक्या मोठ्या प्रमाणावर साकार झाले नसते," असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकल्पामुळे पिंपरी-चिंचवड शहरात महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आता रमाई आंबेडकर यांची स्मारके एकत्रितपणे उभी राहत असून, सामाजिक परिवर्तनाचा एक सशक्त वारसा जपला जात असल्याचेही अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमानिमित्त गायक आनंद शिंदे यांच्या गीतगायनाने भीमसृष्टी परिसर भारावून गेला. सामाजिक जाणीवा जागृत करणाऱ्या आणि प्रेरणादायी गीतांवर उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हा प्रकल्प त्याग, स्त्रीशक्ती आणि सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासाची जाणीव करून देणारे प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## पावसाळी अधिवेशनात राज्याचा स्वतंत्र बियाणे कायदा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : शेतकऱ्यांना स्वतःचे बियाणे साठवणे, वापरणे, देवाण- घेवाण करणे आणि (ब्रँडेड नाव न वापरता) विक्री करण्यास कायदेशीर संरक्षण मिळावे. शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावे. बियाणे खराब निघाल्यास त्याची नुकसानभरपाई तत्काळ मिळावी, यासाठी राज्य सरकार स्वतंत्र बियाणे कायदा करेल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

महाराष्ट्र विधी मंडळाच्या २०२५ च्या दुसऱ्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत या बाबत आश्वासन दिले होते. तसेच बियाणे कायदा १९६६ मधील प्रस्तावित बदल व सुधारणा विधेयकासंदर्भात मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आमदार सुधीर मुनगंटीवार उपस्थित होते. बैठकीस दूरदृश प्रणालीद्वारे राज्यमंत्री आशिष जयस्वाल उपस्थित होते.

राज्यासाठीच्या स्वतंत्र बियाणे कायद्यात बोगस बियाणांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई मिळावी, यासाठी ठोस तरतुदी कराव्यात. दर्जेदार बियाण्यांची जबाबदारी संबंधित कंपन्यांवर निश्चित व्हावी. महाबीज कंपनीची कार्यक्षमता वाढवा. नियमभंग करणाऱ्या बियाणे कंपन्यांवर कठोर कारवाई करा, अशा सूचनाही भरणे यांनी दिल्या.

नव्या कायद्यात बियाणे उत्पादक, प्रक्रिया केंद्र, वितरक, विक्रेते आणि रोपवाटिका यांची नोंदणी सक्तीची करण्याचा विचार आहे.

## संपादकीय

# उलटा प्रवाह आणि गंगेचा काठ



**उत्तर प्रदेश म्हणजे केवळ लोकसंख्येचे ओझे आणि गरिबीचे आगर, हे चित्र आता पुसले जात आहे. स्थलांतराची अगतिकता संपवून विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील होणारा हा नवा प्रदेश भारताच्या अर्थकारणाला नवी दिशा देऊ पाहतोय.**

भारताच्या नकाशावर उत्तर प्रदेश हे राज्य म्हणजे केवळ राजकीय सत्तासंघर्षाचा आखाडा किंवा दिल्लीच्या तख्तापर्यंत पोहोचणारी पायरी, इतकीच त्याची ओळख दशकानुदशके राहिली आहे. 'बिमारू' राज्यांच्या यादीत अग्रक्रमाने येणारे हे राज्य म्हणजे अगतिकतेचे आणि अभावाचे एक दीर्घ महाकाव्य होते. मात्र, काळाचे चक्र फिरते तेव्हा केवळ सत्तेचे चेहरे बदलत नाहीत, तर त्या प्रदेशाच्या आत्मविश्वासाची परिभाषाही बदलते. एकेकाळी पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईच्या लोकलमधून किंवा दिल्लीच्या बसमधून घाम गाळायला येणाऱ्या कामगारांचे हे राज्य, आता गुंतवणुकीचे नवे 'डेस्टिनेशन' म्हणून समोर येत असेल, तर त्यातील स्थित्यंतराचा वेध घेणे अपरिहार्य ठरते. हे स्थित्यंतर केवळ सिमेंटच्या रस्त्यांचे नाही, तर ते तिथल्या माणसाच्या आपल्या मातीशी असलेल्या तुटलेल्या नात्याच्या पुनरुज्जीवनाचे आहे. स्थलांतर हे उत्तर प्रदेशाच्या कपाळावरचे कायमचे लेणे होते. पूर्व उत्तर प्रदेशातील एखादा तरुण जेव्हा गाव सोडून निघायचा, तेव्हा त्याच्या डोळ्यांत स्वप्नांपेक्षा अगतिकता जास्त असायची. ही अगतिकता होती रोजगाराची, सुरक्षेची आणि एका सन्मानजनक आयुष्याची. पण गेल्या काही वर्षांत या अगतिकतेच्या जागी 'आपलेपणा' जागा घेऊ पाहत आहे, ही या राज्याच्या इतिहासातील सर्वात मोठी सामाजिक क्रांती ठरू शकते. स्थलांतर हे पूर्वी 'जगण्यासाठी' असायचे, आता ते कदाचित 'प्रगतीसाठी' असेल; आणि या दोन शब्दांतील अंतर कापण्यासाठी या प्रदेशाने जी मजल मारली आहे, ती थक्क करणारी आहे. या बदलाचा कणा म्हणजे तिथले पायाभूत सुविधांचे जाळे. एकेकाळी जिथे रस्ते शोधायला कंदील लागावा लागायचा, तिथे आता 'एक्सप्रेस-वे'चे जाळे विणले गेले आहे. पूर्वांचल असो वा बुंदेलखंड, या महामार्गांनी केवळ शहरे जोडली नाहीत, तर विकासाच्या धमन्यांमध्ये रक्त खेळवले आहे. पायाभूत सुविधा म्हणजे केवळ डांबर आणि खडी नसते, तर ती भांडवलाला आकर्षित करणारी चुंबकीय शक्ती असते. जेव्हा एखादा उद्योगपती तिथे गुंतवणूक करण्याचा विचार करतो, तेव्हा त्याला केवळ स्वस्त मजूर नको असतो, तर त्याला हवी असते ती अखंड वीज, उत्तम दळणवळण आणि कायद्याचे राज्य. या तिन्ही आघाड्यांवर या राज्याने आपली जुनी प्रतिमा झुगारून देण्याचा जो प्रयत्न केला आहे, त्याचे परिणाम आता आकड्यांच्या भाषेत दिसू लागले आहेत. उत्तर प्रदेशाने 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस'च्या क्रमवारीत घेतलेली झेप ही केवळ कागदोपत्री नाही. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना दिलेले प्रोत्साहन आणि 'एक जिल्हा एक उत्पादन' सारख्या योजनांनी स्थानिक कारागिरांना जे बळ दिले, त्यामुळे तिथला तरुण आता नोकरी मागणारा न राहता नोकरी देणारा बनू पाहत आहे. जेव्हा एखाद्या राज्यातील माणसाला असे वाटू लागते की, आपल्या हक्काच्या मातीत आपल्याला रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत, तेव्हा तो तिथेच स्थिरावतो. शिक्षण आणि आरोग्य या दोन महत्त्वाच्या क्षेत्रांत अजूनही खूप मोठी मजल मारायची बाकी आहे. मात्र, प्रगतीची चाके जेव्हा फिरू लागतात, तेव्हा समाजहिताच्या इतर गोष्टींनाही गती मिळते, हा आजवरचा जागतिक इतिहास आहे. देशाच्या ५ ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेच्या स्वप्नासाठी उत्तर प्रदेशातील हा बदल अत्यंत महत्त्वाचा आहे. कानपूरचा चर्मोद्योग असो वा वाराणसीचे रेशीम काम, जेव्हा हे उद्योग जागतिक बाजारपेठेशी जोडले जातात, तेव्हा राज्याची प्रतिमा 'मागास' कडून 'उदयीमान' कडे झुकते. हा बदल आर्थिक नाही, तर तो राजकीय संस्कृतीच्या बदलाचाही निदर्शक आहे. आता निवडणुका केवळ जातीपातीच्या समीकरणांवर नाही, तर विकासाच्या 'व्हिजन'वर लढवल्या जात आहेत. लोकांच्या अपेक्षा आता वाढल्या आहेत. त्यांना केवळ मोफत रेशन नको आहे, तर त्यांना सन्मानाचे आयुष्य आणि त्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण हवे आहे. ही वाढलेली अपेक्षाच राज्यकर्त्यांना कामाला लावणारी ठरते. उत्तर प्रदेशाची कथा ही जिद्दीची कथा आहे. ज्या राज्याला अनेक दशकांपासून हिणवले गेले, ते राज्य आता आत्मविश्वासाने उभे राहत आहे. स्थलांतराचा शाप पुसून टाकून, आपल्या मातीशी घट्ट नाते जोडणारा हा नवा प्रदेश भारताच्या भविष्याची नवीन पटकथा लिहितोय. गंगेच्या तीरावर आता केवळ आरत्यांचे स्वर घुमत नाहीत, तर तिथे कारखान्यांच्या सायरनचा आवाजही ऐकू येऊ लागला आहे. तो एका नव्या उमेदीचा आणि अस्तित्वाचा आहे.

# भद्रलोक आणि वर्ज्यतेचे विसंगत सत्ताकारण

**» 'बंगाली भद्रलोक' आणि प्रगत राजकारणाचा देखावा यांच्यातील विसंगती उघड झाली आहे. राजकीय सत्तेच्या परिघाबाहेर फेकल्या गेलेल्या समूहांची ही कहाणी, बंगालच्या 'पुरोगामी' प्रतिमेला छेद देणारी ठरते.**



बंगाली अस्मितेचा अभिमान आणि तिथल्या मातीतील क्रांतीची गाणी यांत एक विलक्षण मोहकता असते. कवी रवींद्रनाथ टागोर, सत्यजित राय यांच्यापासून ते अमर्त्य सेन यांच्यापर्यंतच्या नावांची एक न संपणारी मालिका या राज्याने देशाला दिली. प्रबोधनाच्या आणि पुरोगामित्वाच्या झळाळत्या पडद्यामागे एक अत्यंत जटील आणि तितकेच क्रूर सत्य दडलेले आहे, ते म्हणजे 'वर्ज्यतेचे राजकारण'.

बंगालच्या राजकारणाचा विचार करताना आपल्याला प्रथम तिथल्या 'भद्रलोक' या संकल्पनेचा अर्थ समजून घ्यावा लागतो. उच्चवर्णीय, सुशिक्षित आणि प्रामुख्याने शहरी मध्यमवर्गाचे प्रतिनिधित्व करणारा हा वर्ग दशकानुदशके बंगालच्या सत्तेच्या चाव्या फिरवत आला आहे. मग ते डाव्यांचे ३४ वर्षांचे शासन असो किंवा ममता बॅनर्जी यांची गेल्या दीड दशकातील सत्ता; चेहरा बदलला असला तरी सत्तेच्या रचनेतील सामाजिक वर्णक्रम मात्र तोच राहिला आहे. ज्या राज्यात लोकसंख्येचा मोठा भाग दलित, आदिवासी आणि मागासवर्गीयांचा आहे, तिथे या वर्गाचे नेतृत्व सत्तेच्या मुख्य प्रवाहात का दिसत नाही?

डाव्या आघाडीच्या काळात बंगालमध्ये आर्थिक वर्गावर भर दिला गेला, पण सामाजिक जातींना जाणीवपूर्वक दुर्लक्षित ठेवले गेले. 'आमच्याकडे जातीभेद नाही' हा डाव्यांचा दावा प्रत्यक्षात एका मोठ्या समूहाला सत्तेतून बेदखल करण्याचाच एक मार्ग ठरला. ज्या काळात शेजारील बिहार आणि उत्तर प्रदेशात 'मंडल' राजकारणाने पिछड्या वर्गाला सत्तेचे केंद्र बनवले, त्याच काळात बंगालचा भद्रलोक आपल्या वैचारिक कोशात बंदिस्त राहिला. याचे परिणाम आज आपल्यासमोर आहेत. राजकीय प्रतिनिधित्व आणि सामाजिक न्याय यांच्यातील ही दरी इतकी रुंदावली आहे की, तिथला सामान्य माणूस आजही सत्तेच्या उतरंडीत खालच्याच पायरीवर उभा आहे.

बंगालमधील राजकारण हे आजही एका विशिष्ट प्रकारच्या सरंजामशाहीने पछाडलेले आहे. इथे संवाद नाही, तर केवळ 'आदेश' चालतात. तृणमूल काँग्रेसच्या राजवटीत ही प्रवृत्ती अधिक बळावलेली दिसते. स्थानिक पातळीवरील 'सिंडिकेट' आणि दडपशाही यांमुळे तळागाळातील माणसाचा आवाज दबला गेला आहे. जेव्हा सत्तेच्या परिघाबाहेर फेकल्या गेलेल्या या उपेक्षितांना कुठेही स्थान मिळत नाही, तेव्हा ते नैसर्गिकरित्या अशा शक्तीकडे आकर्षित होतात, ज्या त्यांना 'ओळख' मिळवून देण्याचे आश्वासन देतात. बंगालमध्ये भारतीय जनता पक्षाची वाढलेली ताकद ही केवळ धार्मिक ध्रुवीकरणाचे फळ नाही, तर ती डावे आणि तृणमूल यांनी वर्षानुवर्षे केलेल्या 'सामाजिक बहिष्काराचा' उद्रेक आहे.

ममता बॅनर्जी यांनी 'मां, माटी, मानुष'ची घोषणा दिली खरी, पण 'मानुष'च्या व्याख्येत आजही भद्रलोकच केंद्रस्थानी आहेत. लोकशाहीमध्ये जेव्हा ठराविक वर्ग किंवा गट सत्तेवर आपली मक्तेदारी निर्माण करतो आणि लोकसंख्येच्या एका मोठ्या घटकाला केवळ 'व्होट बँक' म्हणून वापरतो, तेव्हा त्या व्यवस्थेला 'समावेशक' म्हणता येत नाही. बंगालमधील दलित आणि राजबंशी समुदायाचा भाजपच्या दिशेने झुकलेला कल हा याच वैफल्याचा परिणाम आहे. बंगालच्या या 'वर्ज्यतेच्या शरीरशास्त्राचा' अभ्यास केल्यास एक गोष्ट स्पष्ट होते की, केवळ भावनिक अस्मितेच्या जोरावर सामाजिक न्यायाचा प्रश्न सोडवता येत नाही. तुम्ही कितीही प्रगत विचारांचे दावे केले, तरी सत्तेच्या वास्तवात जर उपेक्षितांना स्थान नसेल, तर ती व्यवस्था पोकळ ठरते. डाव्यांनी आर्थिक न्यायाचा आव आणला, पण सामाजिक उतरंड कायम ठेवली. ममतांनी बदलाची भाषा केली, पण केवळ सत्ताधारी बदलले, सत्तेची मानसिकता नाही.

आज बंगालचे राजकारण एका निर्णायक वळणावर उभे आहे. लोकशाहीत कोणाचेही अस्तित्व 'वर्ज्य' असू शकत नाही. सत्तेचे मंदिर केवळ एका विशिष्ट वर्गासाठी राखीव राहिले, तर त्या मंदिराच्या भिंती कोसळायला वेळ लागत नाही. बंगालला खरोखरच पुन्हा एकदा देशाचे नेतृत्व करायचे असेल, तर त्यांना प्रथम आपल्या घरातील ही सामाजिक दरी बुजवावी लागेल. अन्यथा, 'भद्रलोक' ही संकल्पना केवळ एका इतिहासजमा झालेल्या उच्चभ्रू वर्गाचे लक्षण म्हणून शिल्लक राहील.

# पिंपरी-चिंचवडमधील विकासकामांना गती द्या

## राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे निर्देश; विविध कामांचा सविस्तर आढावा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व विकासकामांमध्ये गुणवत्ता आणि पारदर्शकता राखत प्रकल्प वेळेत पूर्ण करावेत, तसेच नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश राज्याच्या नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

महानगरपालिकेच्या दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात झालेल्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. शहरातील विविध विकासकामांचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला. बैठकीच्या प्रारंभी महापौर रवि लांडगे यांनी राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे स्वागत केले. यावेळी विधान परिषद सदस्य उमा खापरे, अमित गोरखे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, शहर सुधार समितीचे सभापती संजय काटे, नगर सदस्य कुणाल वाव्हळकर, धर्मराज तंतरपाळे आदी उपस्थित होते. तसेच अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, उपसंचालक नगररचना किशोर गोखले, सहआयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, स्मार्ट सिटीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, सहशहर अभियंते बापू गायकवाड, सुनील भगवानी, प्रेरणा सिनकर, उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सचिन पवार, अण्णा बोदडे, संदीप खोत, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संगणकीय सादरीकरणातून शहरातील पाणीपुरवठा प्रकल्प, अमृत योजना २.०, घनकचरा व्यवस्थापन, रस्ते विकास, ड्रेनेज व पायाभूत सुविधा सुधारणा, मेट्रो प्रकल्प, प्रधानमंत्री आवास योजना, हुतात्मा क्रांतिवीर चापेकर वाडा, अग्निशमन केंद्र, नोकरदार महिला वसतिगृह, संतपीठ, मनोरंजन व नदी सुधार प्रकल्प यांची माहिती दिली. राज्यमंत्री मिसाळ यांनी प्रत्येक प्रकल्पाची सद्यस्थिती, प्रगतीदर, निधी वितरण, तांत्रिक अडचणी आणि उपाययोजनांचा सखोल आढावा घेतला. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा व मलनिस्सारण व्यवस्था मजबूत करण्यावर भर देत सार्वजनिक ठिकाणे, उद्याने व नागरी सुविधा अधिक दर्जेदार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. बैठकीचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले, तर आभार महापौर रवि लांडगे यांनी मानले.

# खासगी ट्रॅव्हल्समुळे वाहतूककोंडी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** शाळांच्या वार्षिक परीक्षा संपल्यानंतर उन्हाळी सुट्टीत गावाकडे जाणाऱ्यांची संख्या वाढली असून एसटीबरोबरच खासगी ट्रॅव्हल्सला प्रवाशांची मोठी पसंती मिळत आहे. मात्र, या ट्रॅव्हल्सचालकांकडून वर्दळीच्या रस्त्यांवर बिनदिक्कत वाहने उभी करून वाहतूककोंडी निर्माण केली जात असल्याचे चित्र शहरात दिसत आहे.

शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलिस विभागाने ऑक्टोबर २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबवून १६ हजार ९८२ ट्रॅव्हल्स बसांवर कारवाई केली. या कारवाईतून २ कोटी १० लाख ९१ हजार १५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात नोकरी व उद्योग-व्यवसायासाठी बाहेरगावाहून येणाऱ्या नागरिकांचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे राज्यातील विविध भागांत जाण्यासाठी खासगी ट्रॅव्हल्सचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. दररोज शेकडो प्रवासी या सेवांचा लाभ घेत असल्याने ट्रॅव्हल्सची संख्या वाढली आहे. मात्र, पुणे-मुंबई महामार्गासारख्या वर्दळीच्या मार्गांवर ट्रॅव्हल्स बस अनियमितपणे उभ्या केल्या जातात. निगडी ते दापोडी ग्रेड सेपरेटर मार्गावर अशा प्रकारांमुळे वारंवार वाहतूककोंडी होत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. या समस्येकडे वाहतूक विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

# ~~शिस्त~~ स्वच्छता राखण्यासाठी प्रशासन कटिबद्ध

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात स्वच्छता व शिस्त राखण्यासाठी महानगरपालिका प्रशासन कटिबद्ध असून अनधिकृत जाहिराती, अतिक्रमणे, बेकायदेशीर नळजोडण्या आणि परवानगीशिवाय सुरू असलेल्या बांधकामांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.

महानगरपालिकेच्या प्रमुख व क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी प्रशासनाला 'ॲक्शन मोड'मध्ये काम करण्याच्या सूचना दिल्या. दृकश्राव्य माध्यमातून पार पडलेल्या या बैठकीत अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सचिन पवार, अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त अमित पंडित, किरणकुमार मोरे, तसेच क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, किशोर ननवरे, परशुराम वाघमोडे, राजाराम सरगर, अजिंक्य येळे, अश्विनी गायकवाड, पूजा दुधनाळे, निवेदिता घार्गे आदी उपस्थित होते.

शहरातील स्वच्छतेवर विशेष भर देत भिंती, दूरध्वनी खांब आणि एमएसईडीसीएलच्या डीपीवर लावण्यात आलेले अनधिकृत बॅनर व जाहिरात फलक तात्काळ हटवण्याचे आदेश देण्यात आले. संबंधित फलकांवरील मोबाईल क्रमांकांच्या आधारे संबंधितांना नोटिसा बजावण्याची कारवाईही केली जाणार आहे. पादचाऱ्यांसाठी सुरक्षित आणि मोकळे मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी "अतिक्रमणमुक्त फुटपाथ" मोहिमेला गती देण्यात येणार असून, यासाठी विशेष पथके क्षेत्रीय स्तरावर कार्यरत राहणार आहेत. अनधिकृत नळजोडण्या शोधून त्यावर कारवाई करण्याचे निर्देश देत पाणी चोरी रोखण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे आयुक्तांनी सांगितले. परवानगीशिवाय सुरू असलेल्या बांधकामांवरही कठोर कारवाई केली जाणार असून, अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांनी घर किंवा सदनिका खरेदी करताना संबंधित बांधकामाला अधिकृत परवानगी असल्याची खात्री करूनच व्यवहार करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६च्या पार्श्वभूमीवर कचरा संकलन, विलगीकरण आणि व्यवस्थापन यावर सखोल आढावा घेण्यात आला. पिंपरी-चिंचवड शहराला देशात अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देशही आयुक्तांनी दिले.

# थकबाकी वसुलीच्या वादातून भररस्त्यात मारहाण

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**




**पुणे :** क्रेडिट कार्ड थकबाकी वसुलीच्या वादातून वसुली एजंटांकडून भररस्त्यात मारहाण केल्याची धक्कादायक घटना हडपसर परिसरात घडली आहे. पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील पंधरा नंबर चौकात सोमवारी (दि. २७) दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला असून या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. तसेच हडपसर पोलिसांच्या कारवाईवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

संदीप जामदार असे मारहाण झालेल्या नागरिकाचे नाव असून जय कासार, विनीत कासार आणि तनिष खुडे या तिघांविरुद्ध हडपसर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, संबंधित तिघे एका खासगी क्रेडिट कार्ड कंपनीचे वसुली एजंट असून थकबाकी वसूल करण्यासाठी त्यांनी जामदार यांना रस्त्यात अडवले. यावेळी झालेल्या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले.

एजंटांनी जामदार यांना भर रस्त्यात लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. यावेळी त्यांच्या सोबत असलेल्या महिलेने हात जोडून मारहाण न करण्याची विनंती केली; मात्र एजंटांनी तिचीही दखल न घेता शिवीगाळ करत मारहाण सुरूच ठेवली. दुपारच्या वेळी घडलेल्या या प्रकारामुळे मोठी गर्दी जमली होती. काही नागरिकांनी या घटनेचा व्हिडिओ मोबाईलमध्ये चित्रित केला असून तो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

या गंभीर प्रकारानंतरही पोलिसांनी केवळ अदखलपात्र गुन्हा दाखल केल्याने नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. "भररस्त्यात मारहाण करूनही फक्त अदखलपात्र गुन्हा?" असा सवाल उपस्थित केला जात आहे. या कारवाईमुळे संबंधितांना मोकळीक मिळाल्याची भावना व्यक्त होत असून भविष्यात अशा घटनांत वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या घटनेदरम्यान एजंटांकडून "पोलीस ठाण्यात चला, दाखवतो" अशा धमक्या दिल्याचाही आरोप समोर आला आहे. त्यामुळे पोलिस व वसुली एजंट यांच्यात संगनमत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. सार्वजनिक ठिकाणी शांतता भंग, मारहाण व धमकी यांसारख्या गंभीर बाबी असूनही संबंधित कायद्यांनुसार गुन्हा नोंदवण्यात का आला नाही, हा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### ज्येष्ठाचा जीव पोलिसांनी वाचवला

**पुणे :** आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या एका ज्येष्ठ नागरिकाचा जीव वाचवण्यात चंदननगर पोलिसांना यश आले असून त्यांच्या समयसूचकतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

चंदननगर पोलीस ठाण्यातील महात्मा फुले मार्शल पथकातील पोलीस अंमलदार तलवारे आणि सतीश कतारी सोमवारी (दि. २७) नियमित गस्तीवर होते. सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास एमडीटी यंत्रणेद्वारे "आत्महत्येचा प्रयत्न" असा तातडीचा कॉल प्राप्त झाला. कॉलरशी संपर्क साधल्यानंतर "वडिलांनी घराचा दरवाजा आतून बंद करून गळफास घेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे," अशी माहिती मिळाली. तत्काळ घटनास्थळी पोहोचलेल्या पथकाला दरवाजा आतून बंद असल्याने परिस्थिती गंभीर असल्याचे लक्षात आले. त्यांनी तातडीने वेल्डरला बोलावून दरवाजा उघडला. आत प्रवेश करताच संबंधित व्यक्ती गळफास घेण्याच्या अवस्थेत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता त्या व्यक्तीला खाली उतरवून त्यांचा जीव वाचवला. संबंधितांच्या नातेवाईकांशी संपर्क साधून त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पोलिसांनी त्या व्यक्तीचे समुपदेशन करून मानसिक आधार दिला व पुढील काळजीसाठी कुटुंबीयांच्या ताब्यात दिले. या धाडसी आणि संवेदनशील कृतीमुळे मोठा अनर्थ टळला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल वरिष्ठ पोलीस निरीक्षक निलेश बडाख आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) अमोल धस यांच्या हस्ते दोन्ही अंमलदारांचा सन्मान करण्यात आला.

# पुण्यात उष्णतेची तीव्र लाट

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** शहरातील कमाल तापमानात मोठी वाढ नोंदवली गेली असून कमाल आणि किमान तापमानातील दरी लक्षणीयरीत्या वाढली आहे. सलग दुसऱ्या दिवशी सोमवारी तापमान ४३ अंश सेल्सिअसवर स्थिर राहिल्याने नागरिक उकाड्याने हैराण झाले.

दिवसभर तीव्र उन्हामुळे नागरिक घामाघूम होत असून रस्त्यावर काम करणारे मजूर, भाजी व फळविक्रेते यांना विशेषतः उष्णतेचा फटका बसत आहे. रात्रीच्या तापमानातही वाढ झाल्याने उकाड्याचा त्रास कायम राहून पुणेकरांची झोप उडत असल्याचे चित्र आहे. गेल्या आठ ते दहा वर्षांत शहराच्या तापमानात मोठे बदल झाले असून २०२० पासून मार्च, एप्रिल आणि मे महिन्यांत नव्या तापमान विक्रमांची नोंद होत आहे. यंदाच्या हंगामात रविवारी प्रथमच पारा ४३ अंशांवर पोहोचला, तर सोमवारीही तो त्याच पातळीवर कायम राहिला.

उष्णतेच्या लाटेमुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवरील वर्दळ कमी झाल्याचे दिसून आले. विविध भागांतील तापमानाचा आढावा घेतल्यास कोरेगाव पार्क आणि लोहगाव येथे ४३ अंश, शिवाजीनगर आणि पाषाण येथे ४१ अंश, तर चिंचवड आणि लवळे येथे ४० अंश तापमान नोंदवले गेले.

दरम्यान, देशातील राजस्थानातील चुरू, उत्तर प्रदेशातील लखनौ आणि बिहारमधील पाटना या शहरांमध्येही तापमान ४३ ते ४४ अंशांच्या दरम्यान नोंदवले जात असून उष्णतेची लाट अधिक तीव्र होत असल्याचे चित्र आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### शेततळ्यात बुडून दोन मुलांचा मृत्यू

**जुन्नर :** तालुक्यातील बल्लाळवाडी येथे शेततळ्यात बुडून दोन लहान मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (दि. २८) दुपारी सुमारे साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली. सोहम जयसिंग नवले (वय १२) आणि अभि महेश पवार (वय १०) अशी मृत मुलांची नावे आहेत. गाडेकर यांच्या शेतातील तळ्यात ही दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस व बचाव पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी दोन्ही मुलांचे मृतदेह तळ्यातून बाहेर काढले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून ग्रामस्थांमध्ये शोककळा पसरली आहे. दरम्यान, अशा घटना टाळण्यासाठी लहान मुलांनी शेततळे किंवा पाण्याच्या साठ्यांमध्ये जाणे टाळावे आणि पालकांनीही योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### बिलाच्या वादातून ग्राहकांना मारहाण

**पिंपरी :** बिल देण्याच्या कारणावरून सुरू असलेला वाद सोडवण्यासाठी गेलेल्या ग्राहकांना हॉटेलमालक व कर्मचाऱ्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना पिंपळे गुरव येथे घडली. रविवारी रात्री सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास हॉटेलच्या पार्किंगमध्ये हा प्रकार घडला. याप्रकरणी सूरज शंकर झांजुर्णे (वय ३२, रा. भोसरी) यांनी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार विकास अनिलकुमार सेवाणी, आशिष सुनील भेगडे, प्रेम दिलबहादूर थापा आणि अनिलकुमार अर्जनदास मेवाणी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, संबंधित हॉटेलमध्ये बिलाच्या कारणावरून एका ग्राहकासोबत वाद सुरू होता. फिर्यादी आणि त्यांचे मित्र हा वाद सोडवण्यासाठी गेले असता आरोपींनी "तुम्ही आमच्यात का पडता" असे म्हणत त्यांच्याशी शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या प्रकरणाचा तपास सांगवी पोलीस करत आहेत.

### कडूस येथील रहिवाशांचा पंचायत समितीवर हंडा मोर्चा

# आदिवासी महिलांचे पाण्यासाठी आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** कडूस, ता. खेड येथील पुशीदरा ठाकरवस्तीमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. वस्तीतील प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणीपुरवठा करणारी योजना तात्काळ कार्यान्वित करावी, या मागणीसाठी आम आदमी पार्टीच्या नेतृत्वाखाली महिलांनी सोमवारी (दि. २७) खेड पंचायत समितीवर हंडा मोर्चा काढला.

कडूस येथील पुशीदरा ठाकरवस्ती ही पूर्णपणे आदिवासी समाजाची वस्ती असून येथील घरे अधिकृत आहेत. नागरिक नियमितपणे ग्रामपंचायतीला घरपट्टी भरत असतानाही त्यांना मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवण्यात आले आहे. वस्तीमध्ये आजतागायत एकाही घरापर्यंत नळजोडणी देण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी




मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. उन्हाळ्यात वस्ती परिसरातील नैसर्गिक पाणीस्रोत पूर्णपणे आटले आहेत. परिणामी महिला, पुरुष तसेच लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच दोन ते अडीच किलोमीटर अंतरावरून डोक्यावर हंडे वाहून पाणी आणावे लागत आहे. ही परिस्थिती गंभीर असून नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे सांगण्यात आले. वस्तीतील प्रत्येक घरापर्यंत नळयोजनेद्वारे पाणी पोहोचवावे, तसेच योजना पूर्ण होईपर्यंत तातडीने टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा करावा, या मागण्यांसाठी पंचायत समितीच्या प्रवेशद्वारासमोर आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाचे नेतृत्व आम आदमी पार्टीचे तालुका अध्यक्ष स्वप्नील गायकवाड यांनी केले. यावेळी पुणे जिल्हा आरपीआय श्रमिक ब्रिगेडचे अध्यक्ष संतोष डोळस, छबाबाई रघुनाथ पारधी, लक्ष्मी गणेश पारधी, आरती सुखदेव पारधी, मंदा दादाभाऊ पारधी, संगीता बबन पारधी, सुरेखा संजय पारधी, बबाबाई शिवराम पारधी, विमल सिताराम पारधी, पूजा ज्ञानेश्वर पारधी, संगीता कुंडलिक पारधी, जिजा काळूराम काळे, शांताबाई बाळू पारधी, उज्वला अक्षय पारधी, मीरा सुरेश पारधी, शोभा किसन पारधी यांच्यासह मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या. गटविकास अधिकारी विशाल शिंदे, पाणीपुरवठा उपअभियंता कालिका खरात, सहाय्यक गटविकास अधिकारी भोईर, कडूस ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी सुरेश घनवट, तसेच शिवसेनेचे तालुका उपप्रमुख संजय घनवट यांनी आंदोलकांची भेट घेतली. यावेळी महिलांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरत संताप व्यक्त केला.

कडूस येथील पाणीपुरवठा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अखत्यारीत असून ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, खेड पंचायत समितीच्या अखत्यारीत नाही. पुशीदरा ठाकरवाडीला पाणीपुरवठा करण्यासाठी वित्त आयोगाच्या निधीतून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मंगळवार पासून या कामास सुरुवात करण्यात येणार असून सध्या ग्रामपंचायतीमार्फत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे, अशी माहिती गटविकास अधिकारी विशाल शिंदे यांनी दिली.

## पालखी मार्ग रुंदावला मात्र झाडांची बेसुमार कत्तल

■ दैनिक राज्य लोकतंत्र


**पुणे :** आषाढी वारीसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा ८ जुलै रोजी आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान करणार असून दिवे घाट ते निरा या सुमारे ५० किलोमीटर मार्गाचे चौपदरीकरण जवळपास पूर्णत्वास आले आहे. मात्र या कामादरम्यान मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल झाल्याने यंदाही वारकऱ्यांना रखरखत्या उन्हात पायी वारी करावी लागणार आहे.

श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा पुरंदर तालुक्यातून ११ ते १५ जुलैदरम्यान मार्गस्थ होणार आहे. या मार्गावर पूर्वी मोठ्या प्रमाणात सावलीची झाडे होती. वारकरी या झाडांच्या सावलीत विसावा घेत पुढील प्रवास करत होते. मात्र गेल्या तीन ते चार वर्षांपासून सुरू असलेल्या मार्ग रुंदीकरणामुळे हजारो झाडे तोडण्यात आली असून आता मार्गावर सावलीचा अभाव निर्माण झाला आहे.

जेजुरी औद्योगिक वसाहत ते पिसुर्टी फाटा या दरम्यानचा पालखी मार्ग रुंदावण्याचे काम पूर्ण झाले आहे. या मार्गावर शंभर वर्षांहून अधिक जुनी झाडे होती. तसेच दौंडज खिंड ते पिसुर्टी कमान या दरम्यानही गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर झाडांची तोड करण्यात आली आहे. परिणामी पालखी मार्ग रुंद झाला असला, तरी किमान दहा वर्षे तरी या मार्गावर सावलीची झाडे निर्माण होणे कठीण असल्याचे वृक्षप्रेमींचे मत आहे.

जेजुरी मुक्कामानंतर वाल्हेकडे जाताना दौंडज खिंडीत पालखी सोहळ्याचा न्याहरीसाठी विसावा असतो. या ठिकाणी पूर्वी असलेले वटवृक्ष, पिंपळ आणि इतर झाडेही तोडण्यात आल्याने परिसर ओसाड झाला आहे. या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांसाठी सावलीची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि पर्यायी उपाययोजना करण्याची मागणी नागरिक व वारकरी संस्थांकडून करण्यात येत आहे.

# अवसरी खुर्द येथे बिबट्या जेरबंद



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील अवसरी खुर्द येथील कौली मळा परिसरात रविवारी (दि. २६) रात्री सुमारे एक वर्षाचा बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले. मागील काही दिवसांपासून या परिसरात बिबट्यांचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते.

कौली मळा येथील सुलोचना वाळके यांच्या घराशेजारी गेल्या साडेचार महिन्यांत सुमारे सहा वेळा बिबट्यांचा वावर सीसीटीव्हीमध्ये दिसून आला होता. यापूर्वी जानेवारी महिन्यातही येथे लावलेल्या पिंजऱ्यात एक बिबट्या अडकला होता. त्यानंतर दोन वेळा या परिसरात दोन बिबटे फिरताना आढळले होते.

२२ फेब्रुवारी रोजी रात्री पावणे बारा वाजता एक बिबट्या घराच्या पोर्चमध्ये तसेच अंगणात आला होता. त्यानंतर २४ मार्च रोजी रात्री साडेनऊ वाजता दोन बिबटे परिसरात फिरताना दिसले. पुन्हा या घटनांनंतर वनविभागाने परिसरात पिंजरा लावला होता. रविवारी रात्री सुमारे साडेअकराच्या सुमारास दुसरा बिबट्या पिंजऱ्यात अडकला. यावेळी स्थानिक नागरिकांनी मदत करत पिंजरा वाहनात चढवण्यासाठी सहकार्य केले. वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी नागरिकांना रात्रीच्या वेळी सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. बाहेर पडताना किंवा शेतात जाताना टॉर्च, काठी किंवा घुंगरांनी सज्ज काठी सोबत ठेवावी, घाबरून जाऊ नये आणि बिबट्याचा वावर आढळल्यास तात्काळ वनविभागाला कळवावे, असे त्यांनी सांगितले.

# खंडाळेच्या विकासासाठी भरीव निधी देणार

### दिलीप वळसे पाटील यांचे आश्वासन




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांजणगाव गणपती :** खंडाळे गाव व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असून विविध विकासकामांसाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिले.

खंडाळे, ता. शिरूर येथे सुमारे ४८ लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या सभामंडपाच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी खंडाळे येथील महिला अस्मिता भवन व दोन खोल्यांसाठी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहितीही त्यांनी दिली. यावेळी शिरूर बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश पवार, आंबेगाव-शिरूर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर, दत्तात्रय कदम, विश्वास कोहकडे, प्रविण ढोकले, शुभांगी पडवळ, सनी थिटे, प्रा. माणिक खेडकर, महेश फंड, दशरथ फंड, गहिनीनाथ नरवडे, मारुती नरवडे, संतोष महाराज खेडकर, योगेश कर्डीले, सोपान नरवडे, विठ्ठल नळकांडे, नेहा महाराज भोसले आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजाने चुकीच्या गोष्टींच्या मागे लागू नये, जीवनात प्रामाणिकपणा महत्त्वाचा असून नेहमी चांगुलपणाने वागावे, असे आवाहन वळसे पाटील यांनी केले. तसेच येथील नळपाणीपुरवठा योजना पूर्णत्वास नेण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सभामंडपासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल दिलीप वळसे पाटील आणि गहिनीनाथ नरवडे यांचा ग्रामस्थांच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# आंबेगावात उन्हाळी बाजरी काढणीला वेग



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात उन्हाळी बाजरी काढणीला वेग आला असून यंदा उत्पादनात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हंगामाच्या सुरुवातीपासूनच अनुकूल हवामान आणि मुबलक पाण्याची उपलब्धता मिळाल्याने पिकांची वाढ चांगली झाली आहे.

हंगामभर पोषक वातावरण मिळाल्यामुळे अनेक ठिकाणी बाजरीची कणसे दाणेदार भरलेली दिसत असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

तालुक्याच्या पूर्व भागातील थोरांदळे, नागापूर, वळती, रांजणी, शिंगवे आणि पारगाव या गावांमध्ये सध्या काढणीची कामे जोमात सुरू आहेत. मात्र, पीक अंतिम टप्प्यात असतानाच काही भागांत अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. या पावसामुळे काही ठिकाणी पिके आडवी पडली असून कणसांचे नुकसान झाले आहे.

बहुतांश भागातील पिकांची स्थिती चांगली असल्याने यंदा उत्पादनात वाढ होईल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

चांगल्या उत्पादनाच्या आशेने शेतकरी वर्गात उत्साहाचे वातावरण असून काढणीची कामे वेगाने सुरू आहेत.

## आंबेगावात शेणखताला वाढती मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात सध्या शेती हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेणखताला मोठ्या प्रमाणावर मागणी वाढत आहे. ऊस लागवड, टोमॅटो तसेच इतर भाजीपाला पिकांसाठी सेंद्रिय खताची गरज भासत असल्याने शेतकरी शेणखत खरेदीकडे वळले आहेत. परिणामी तालुक्यात शेणखताचा तुटवडा जाणवू लागला आहे.

सध्या अनेक शेतकरी आगामी लागवडीच्या तयारीला लागले असून शेतजमिनीची मशागत करून त्यामध्ये शेणखत मिसळण्यावर भर देत आहेत. जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी आणि उत्पादनात गुणवत्ता मिळवण्यासाठी शेणखत उपयुक्त ठरत असल्याने त्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे.

मागणी वाढल्यामुळे शेणखताच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. ट्रॅक्टर ट्रॉलीमागे दर सुमारे साडेसहा हजार



रुपयांपर्यंत पोहोचले असून त्यामुळे शेतकऱ्यांच्या खर्चात वाढ झाली आहे. काही ठिकाणी शेणखत उपलब्ध होणेही कठीण झाले असून शेतकरी एकमेकांकडून खरेदी करताना दिसत आहेत.

दरम्यान, रासायनिक खतांच्या तुलनेत सेंद्रिय शेणखतामुळे जमिनीची गुणवत्ता सुधारते आणि दीर्घकालीन फायदा होतो, याची जाणीव शेतकऱ्यांना होत आहे. त्यामुळे सेंद्रिय शेतीकडे कल वाढत असून येत्या काळात शेणखताची मागणी आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पक्ष्यांसाठी 'बर्ड फूड फिडर'चा उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** मांदळेवाडी (ता. आंबेगाव) हे दुष्काळग्रस्त गाव असून दरवर्षी तीन-चार महिने येथे पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवते. माणसे कशीबशी पाण्याची व्यवस्था करतात; मात्र पशू-पक्ष्यांचे काय, हा प्रश्न कायमच राहतो. ही समस्या लक्षात घेऊन येथील पक्षीप्रेमी प्रदीप आदक यांनी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पक्ष्यांसाठी पाणी व खाद्याची व्यवस्था करत आपल्या घरासमोरील बागेत 'बर्ड फूड फिडर' बसवले आहे.

यावर्षी तापमान ४० ते ४५ अंशांपर्यंत पोहोचले आहे. पक्षी संवर्धन आणि निसर्ग संगोपनासाठी सर्वांनी पुढे येण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. अन्यथा येत्या काळात तापमान ५० ते ५५ अंशांपर्यंत जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी



नमूद केले.

प्रदीप आदक यांनी आपल्या घराभोवती आंबा, फणस, केळी, चिकू, नारळ, पेरू, अंजीर अशी विविध झाडे लावली आहेत. या झाडांमुळे सावली व फळांच्या आकर्षणामुळे चिमण्या, साळुंकी, कावळे, पोपट आदी पक्ष्यांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढली आहे.

निसर्ग आपल्याला भरपूर देतो, त्यामुळे आपणही निसर्गाचे काही देणे लागतो, असे सांगत त्यांनी जुन्नर येथील निसर्गप्रेमी रमेश खरमाळे यांचा आदर्श घेत पुढील काळात अधिक झाडे लावण्याचा व पशू-पक्ष्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच सर्व नागरिकांनी पक्ष्यांसाठी पाणी व खाद्याची व्यवस्था करावी, असे आवाहन त्यांनी केले.

### चाकण पोलिसांची कारवाई; सात आरोपींकडून ३१ लाखांचा मुद्देमाल जप्त

# घरकुलच्या साहित्यावर डल्ला मारणारी टोळी गजाआड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** पंतप्रधान आवास योजनेच्या बांधकाम साईटवरून तब्बल २८० स्क्वेअर मीटरच्या ॲल्युमिनियम शटरिंग प्लेट्स चोरणाऱ्या टोळीचा चाकण उत्तर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी मुख्य सूत्रधारासह चार चोरटे आणि चोरीचा माल विकत घेणाऱ्या तीन भंगार व्यावसायिकांना अटक केली आहे. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली वाहने आणि चोरीचा माल असा एकूण ३१ लाख १०




हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

चाकण नगरपरिषद हद्दीतील राक्षेवाडी येथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत २१० घरांचे बांधकाम सुरू आहे. १० ते १६ एप्रिल दरम्यान अज्ञात चोरट्यांनी या ठिकाणाहून २० लाख रुपये किमतीच्या शटरिंग प्लेट्सची चोरी केली होती. याप्रकरणी १८ एप्रिल रोजी चाकण उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचा तपास करत असताना पोलिसांना घटनास्थळी एक बेवारस दुचाकी सापडली. या दुचाकीच्या तांत्रिक तपासावरून पोलिसांनी गुन्ह्याचा धागा पकडला. सीसीटीव्ही फुटेज आणि मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी सुसगाव येथून मुख्य आरोपी रामरक्षा ऊर्फ राजू पासवान (वय ४०) याला ताब्यात घेतले. त्याने दिलेल्या कबुलीवरून त्याचे साथीदार स्वराज कालापाड (२३), स्वप्नील कालापाड (२५) आणि अक्रम खान (२८, सर्व रा. येलवाडी) यांना अटक करण्यात आली.

आरोपींनी चोरलेल्या ॲल्युमिनियम प्लेट्ससह गुन्ह्यात वापरलेला एक टेम्पो, पिकअप आणि दोन दुचाकी असा एकूण ३१ लाख १० हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. चोरीचा माल विकत घेणाऱ्या आणखी तीन आरोपींनाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह आयुक्त डॉ. महावरकर, अपर आयुक्त सारंग आव्हाड, बसवराज तेली, उपायुक्त मारुती जगताप, साहाय्यक आयुक्त सचिन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, पोलीस निरीक्षक विनोद पाटील, उपनिरीक्षक चंद्रशेखर मोरखंडे, कर्मचारी यादव, ढमढेरे, कोळेकर, कोळी, लोखंडे आणि जगताप यांच्या पथकाने केली.

## जुन्नर तालुक्यात उष्माघाताने शेतकरी महिलेचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** जुन्नर तालुक्यातील निमगाव सावा येथे उष्माघातामुळे एका शेतकरी महिलेचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि. २७) सकाळी घडली. रूपाली भाऊ गाडगे (वय ४०) असे मृत महिलेचे नाव आहे.

रूपाली गाडगे या गेल्या दोन दिवसांपासून कडक उन्हात शेतात खुरपणीचे काम करत होत्या. सोमवारी सकाळी सुमारे साडेअकराच्या सुमारास त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. त्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने निमगाव सावा येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष रास्ते यांनी त्यांच्यावर उपचार सुरू केले. तपासणीदरम्यान त्यांचा रक्तदाब कमी झाल्याचे आढळून आले. प्राथमिक उपचारानंतर प्रकृतीत काहीशी सुधारणा झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. मात्र, अधिक तपासण्यांसाठी त्यांना पुढील तपासणी केंद्रात जाण्याचा सल्ला देण्यात आला. तपासणीसाठी जात असताना वाहनात बसताना त्यांना चक्कर येऊन त्या बेशुद्ध पडल्या. त्यानंतर काही वेळातच त्यांचा मृत्यू झाला. रूपाली गाडगे यांच्या पश्चात पती आणि तीन मुले असा परिवार आहे. दरम्यान, वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर शेतकरी व नागरिकांनी दुपारच्या कडक उन्हात काम टाळावे, पुरेसे पाणी प्यावे आणि आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे.

## सारांश वृत्त

### झारखंडमध्ये १ मे पासून स्वयंगणना

**रांची:** झारखंडमध्ये जनगणना २०२७ चा पहिला टप्पा १ मे रोजी स्वयं-गणना प्रक्रियेने सुरू होईल, ज्यामध्ये लोकांना त्यांच्या कुटुंबाचा तपशील डिजिटल पद्धतीने देण्याची मुभा असेल, असे अधिकाऱ्यांनी मंगळवारी सांगितले. झारखंडच्या जनगणना कार्य संचालनालयाचे संचालक प्रभात कुमार यांनी सांगितले की, हे काम १५ मे पर्यंत सुरू राहील.

### उष्माघात रुग्णांसाठी खाटा राखीव ठेवा

**जयपूर** : वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर, उष्णतेमुळे होणाऱ्या आजारांना तोंड देण्यासाठी राजस्थानमधील रुग्णालयांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून, उष्माघाताच्या रुग्णांसाठी सामान्य आणि आयसीयू बेड राखीव ठेवण्यात आले आहेत, असे अधिकाऱ्यांनी मंगळवारी सांगितले. उष्णतेच्या लाटेच्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर, वैद्यकीय शिक्षण संचालनालयाने उष्णतेमुळे होणाऱ्या आजारांच्या प्रतिबंध आणि व्यवस्थापनासाठी सर्व रुग्णालयांना एक सूचना जारी केली आहे. वैद्यकीय अधीक्षक आणि वैद्यकीय महाविद्यालयांच्या प्राचार्यांना डॉक्टर, नर्सिंग आणि पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करून त्यांची मुख्यालयात उपस्थिती सुनिश्चित करण्यास सांगण्यात आले आहे.

### अमली पदार्थ तस्कराला अटक

**जयपूर** : राजस्थानच्या नागौरमध्ये अंमली पदार्थ विरोधी मोहिमेदरम्यान एका अंमली पदार्थ तस्कराला अटक करण्यात आली आणि त्याच्या ताब्यातून एक लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीचे ५१२ ग्रॅम हेरॉईन जप्त करण्यात आले, अशी माहिती पोलिसांनी दिली. 'ऑपरेशन संकल्प, नशा मुक्त नागौर' अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. मेर्ता शहर सर्कल ऑफिसर रामकरण सिंग मालिंदा यांनी सांगितले की, बारन जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या राजेश नावाच्या आरोपीला जिल्हा विशेष पथक आणि मेर्ता शहर पोलिसांच्या संयुक्त पथकाने डांगवास परिसरातून अटक केली.

## गुजरात स्थानिक स्वराज्य निवडणुकांचे निकाल जाहीर

# भाजपचे घवघवीत यश; काँग्रेसला धक्के

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अहमदाबाद** : गुजरातमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल मंगळवारी जाहीर होऊ लागले असून सुरुवातीच्या कलांमध्ये भारतीय जनता पक्षाने आघाडी घेतली आहे. आम आदमी पक्षाने काही ठिकाणी प्रतीकात्मक यश मिळवले असले, तरी काँग्रेसला प्रमुख बालेकिल्ल्यांमध्ये मोठे धक्के बसल्याचे चित्र आहे. या निकालांमुळे २०२७ च्या विधानसभा निवडणुकांची पार्श्वभूमी तयार होत असल्याचे मानले जात आहे.

राज्यातील १५ महानगरपालिका, ८४ नगरपालिका, ३४ जिल्हा परिषदा आणि २६० तालुका पंचायतांसाठी मतमोजणी सुरू असून एकूण १०,०५० जागांपैकी ७३२ जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत. उर्वरित जागांसाठी चुरशीची लढत सुरू आहे. सुरुवातीपासूनच भाजपची पकड मजबूत असल्याचे दिसून येत असून पक्ष आणखी एका मोठ्या विजयाकडे वाटचाल करत असल्याचे संकेत आहेत. मात्र, काही ठिकाणी अनपेक्षित पराभव, स्थानिक पातळीवरील उलथापालथ आणि प्रतीकात्मक विजयांमुळे राजकीय समीकरणे बदलताना दिसत आहेत.

आम आदमी पक्षाला अमरेली जिल्ह्यातील बागसरा तालुका पंचायत जिंकत ऐतिहासिक यश मिळाले. गुजरातमधील कोणत्याही पंचायत संस्थेत 'आप'ची ही पहिली सत्ता ठरली आहे. २०२२ च्या विधानसभा निवडणुकांनंतर पुन्हा उभारी घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या पक्षासाठी हा विजय महत्त्वाचा मानला जात आहे. मात्र, सुरत महानगरपालिकेत 'आप'ला मोठा धक्का बसला. वॉर्ड क्रमांक ४ मध्ये, जो पाटीदार-बहुल मतदारसंघ मानला जातो, भाजपने निर्विवाद विजय मिळवत विरोधकांच्या आशा धुळीस मिळवल्या. 'आप'चे राज्य सरचिटणीस मनोज सोरठिया यांच्याकडे लक्ष असताना, भाजपने येथे वर्चस्व कायम ठेवले.

राजकोटमध्ये काँग्रेसने क्रिकेटपटू रवींद्र जडेजा यांची बहीण नयनाबा जडेजा यांना उमेदवारी दिली होती; मात्र वॉर्ड क्रमांक २ मध्ये भाजपच्या संपूर्ण पॅनलने विजय मिळवत काँग्रेसला एकही जागा मिळू दिली नाही. मेहसाणा महानगरपालिकेत प्रभाग क्रमांक १३ मध्ये भाजपने महत्त्वाचा विजय मिळवला. कमलाम येथील पक्ष कार्यालयात शिपाई म्हणून कार्यरत असलेले रमेशभाई भिल यांच्यासह संपूर्ण पॅनल विजयी झाले. यामुळे 'कार्यकर्ता ते विजेता' अशी कथा भाजपला अधोरेखित करता आली. वडोदरा जिल्हा पंचायतीत सोशल मीडिया व्यक्तिमत्व अंकिता परमार यांनी ६,४०० मतांच्या फरकाने विजय मिळवत लक्ष वेधून घेतले. या निकालांमुळे राज्यातील तळागाळातील संघटनात्मक ताकद स्पष्ट होत असून, आगामी विधानसभा निवडणुकांसाठी राजकीय पक्षांच्या रणनीतीला नवी दिशा मिळणार असल्याचे चित्र आहे.

# अमेरिका आम्हाला अटी लादण्याच्या स्थितीत नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान** : होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्याबाबतच्या प्रस्तावावर चर्चा सुरू असतानाच, इराणने अमेरिकेला सुनावले आहे. इतर देशांना अटी घालण्याच्या स्थितीत अमेरिका राहिलेली नाही, असे स्पष्ट वक्तव्य इराणच्या संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते रझा तलाई-निक यांनी मंगळवारी केले.

अमेरिका आणि इस्रायलसोबतच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराणने हा सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा जलमार्ग बंद ठेवल्याने जागतिक ऊर्जा बाजारात खळबळ उडाली आहे. युद्धविराम लागू झाल्यानंतरही या प्रश्नावर तोडगा निघालेला नसून, होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा सुरू करण्याचा प्रस्ताव सध्या चर्चेत आहे.

सरकारी माध्यमांनुसार, तलाई-निक यांनी अमेरिकेने "बेकायदेशीर आणि अतार्किक मागण्या" मागे घ्याव्यात, असे सांगितले. तसेच, इराण स्वतंत्र देशांसोबत, विशेषतः शांघाय सहकार्य संघटनेतील सदस्य राष्ट्रांसोबत, संरक्षणविषयक सहकार्य वाढवण्यास तयार असल्याचे त्यांनी नमूद केले.

अमेरिकेने इराणवरील निर्बंध उठवल्यास सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्याचा प्रस्ताव तेहरानकडून पुढे आला आहे. मात्र, या प्रस्तावामुळे इराणच्या अणुकार्यक्रमावरील चर्चेला फाटा मिळू शकतो, अशी शक्यता व्यक्त करत अमेरिकेने सावध भूमिका घेतली आहे. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांनी स्पष्ट केले की, कोणताही करार झाल्यास तो इराणला अण्वस्त्र निर्मितीकडे जाण्यापासून रोखणारा असावा. व्हाइट हाऊसनुसार, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या राष्ट्रीय सुरक्षा पथकाने या प्रस्तावावर चर्चा केली असून अंतिम भूमिका लवकरच स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी नुकतीच रशियाची भेट घेतली असून, या चर्चेत होर्मुझ सामुद्रधुनीचा मुद्दा महत्त्वाचा ठरला आहे. रशियाने इराणच्या भूमिकेला पाठिंबा दर्शवला असला, तरी पुढील मदतीबाबत अद्याप स्पष्टता नाही.

# काँग्रेसी सुखबीर कटारिया यांच्यावर गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गुरुग्राम** : सरकारी अनुदानाचा गैरवापर केल्याच्या आरोपावरून हरियाणा पोलिसांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री सुखबीर कटारिया यांच्यासह अन्य चौघांविरुद्ध भ्रष्टाचारविरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

सेक्टर १२ येथील रहिवासी ओमप्रकाश कटारिया यांनी दाखल केलेल्या याचिकेच्या आधारे गुरुग्राम न्यायालयाने एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. सुमारे वर्षभरापूर्वी दाखल झालेल्या याचिकेत, मंत्रीपदावर असताना कटारिया यांनी स्वतःच्या घराच्या दुरुस्तीसाठी सुमारे २० लाख रुपयांचे अनुदान वळविल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, संबंधित घर माजी मंत्र्यांचे असतानाही अनुदान अनंत सिंग, शर्मिला देवी आणि बसंती देवी यांच्या नावावर मंजूर दाखवण्यात आले.

यासंदर्भातील वीज बिलांसह कागदपत्रे न्यायालयात सादर करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. या प्रकरणात गुरुग्राम पोलिसांनी यापूर्वी दोन अहवाल सादर करून माजी मंत्र्यांना निर्दोष ठरवले होते. मात्र न्यायालयाने या अहवालांवर प्रश्न उपस्थित करत अनुदानाच्या वैधतेची योग्य पडताळणी न झाल्याचे नमूद केले आणि एफआयआर नोंदवण्याचे निर्देश दिले. "आरोप सिद्ध झाल्यास हा दखलपात्र गुन्हा ठरू शकतो. त्यामुळे निष्पक्ष चौकशी आवश्यक आहे," असे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायालयाच्या आदेशानुसार न्यू कॉलनी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, प्रकरणाचा सखोल तपास सुरू असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, सुखबीर कटारिया यांनी या आरोपांचे खंडन केले आहे.

# उष्णतेच्या लाटेमुळे विजेची मागणी उच्चांकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : देशभर पसरलेल्या तीव्र उष्णतेच्या लाटेमुळे कुलिंग उपकरणांच्या वाढत्या वापराचा परिणाम म्हणून भारतातील विजेची मागणी विक्रमी पातळीच्या जवळ पोहोचली आहे. सोमवारी (दि. २७) देशाची कमाल वीज मागणी २५५.८५ गिगावॅटवर नोंदवली गेली, जी २५ एप्रिल रोजी नोंदवलेल्या २५६.११ गिगावॅट या उच्चांकाच्या जवळपास आहे.

ऊर्जा मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, एप्रिलच्या उत्तरार्धात विजेच्या मागणीत झपाट्याने वाढ झाली असून २४ एप्रिल रोजी ती २५२.०७ गिगावॅटपर्यंत पोहोचली होती. उत्तर, मध्य आणि पश्चिम भारतातील तापमानवाढीमुळे एअर कंडिशनर, कूलर आणि इतर थंड उपकरणांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

दरम्यान, रविवारी (दि. २६) मागणीत घट होऊन ती २३८.१५ गिगावॅटवर आली. आठवड्याच्या शेवटी औद्योगिक व व्यावसायिक हालचाली मंदावणे, तसेच काही भागांत झालेला हलका पाऊस व धुळीच्या वादळांमुळे मिळालेला दिलासा यामुळे ही घट झाली. मात्र, त्या दिवशी २३७.२१ गिगावॅट इतका वीजपुरवठा नोंदवला गेला असून मागणीच्या तुलनेत सुमारे ०.९३ गिगावॅटची तूट राहिली.

गेल्या काही वर्षांत विजेच्या मागणीत सातत्याने वाढ होत आहे. जून २०२५ मध्ये कमाल मागणी २४२.७७ गिगावॅटवर पोहोचली होती, तर मे २०२४ मध्ये २५० गिगावॅटचा विक्रम नोंदवला गेला होता. त्यापूर्वी सप्टेंबर २०२३ मध्ये २४३.२७ गिगावॅटचा उच्चांक होता.

भारतीय हवामान विभागाने यंदा अधिक तीव्र उन्हाळ्याचा अंदाज वर्तवला असून मे-जून महिन्यात विजेच्या मागणीत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. केंद्र सरकारने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना उष्माघात व्यवस्थापनासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

ऊर्जा तज्ज्ञांच्या मते, तापमानवाढ कायम राहिल्यास या हंगामात विजेची कमाल मागणी २७० गिगावॅटपर्यंत जाऊ शकते. एप्रिलच्या सुरुवातीपासूनच मागणीत वाढीचा कल दिसून येत असून, २२ आणि २३ एप्रिल रोजी अनुक्रमे २३९.७० आणि २४०.१२ गिगावॅट इतका पुरवठा नोंदवण्यात आला होता.

# एटीएफ दरवाढीने विमान वाहतूक क्षेत्र संकटात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : एव्हिएशन टर्बाइन फ्युएल (एटीएफ) च्या गगनाला भिडलेल्या किमतींमुळे देशातील विमान वाहतूक क्षेत्र गंभीर आर्थिक संकटात सापडले असून, तात्काळ दिलासा न मिळाल्यास कामकाज थांबवण्याची वेळ येऊ शकते, असा इशारा एअर इंडिया, इंडिगो आणि स्पाईसजेट या विमान कंपन्यांनी केंद्र सरकारला दिला आहे.

पश्चिम आशियातील वाढती अस्थिरता आणि हवाई क्षेत्रावरील निर्बंधांमुळे कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ झाली आहे. याचा थेट परिणाम एटीएफच्या दरांवर झाला असून विमान कंपन्यांच्या परिचालन खर्चात मोठी वाढ झाली आहे. विमान कंपन्यांच्या एकूण खर्चापैकी सुमारे ४० टक्के खर्च हा एटीएफवर होतो. फेडरेशन ऑफ इंडियन एअरलाइन्सने नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाला पत्र लिहून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी समान इंधन दर प्रणाली लागू करण्याची मागणी केली आहे. कच्चे तेल आणि एटीएफमधील दरातील प्रचंड तफावत विमान कंपन्यांसाठी मोठे आव्हान ठरत असल्याचे महासंघाने नमूद केले आहे. एटीएफच्या दरात होत असलेली अनिश्चित व अविवेकी वाढ कायम राहिल्यास विमान कंपन्यांना मोठे नुकसान सहन करावे लागेल आणि काही उड्डाणे रद्द करण्याची वेळ येऊ शकते, असा इशाराही देण्यात आला आहे. "सध्याच्या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी तातडीने भरीव आर्थिक मदतीची आवश्यकता आहे," असे २६ एप्रिल रोजी पाठवलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे. सरकारने डिझेलवरील निर्यात शुल्क प्रति लिटर ५५.५ रुपये आणि एटीएफवरील शुल्क ४२ रुपये प्रति लिटरपर्यंत वाढवले आहे. तसेच एटीएफवरील ११ टक्के उत्पादन शुल्काला तात्पुरती स्थगिती देण्याची मागणी विमान कंपन्यांनी केली आहे.

## विकासाला गती देण्यास सरकार कटिबद्ध

# ईशान्य भारत 'अष्टलक्ष्मी'

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली/गंगटोक** : ईशान्येकडील राज्ये ही भारताची 'अष्टलक्ष्मी' असून ती समृद्धी, संपत्ती आणि शुभतेचे बहुआयामी प्रतीक आहेत, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केले. या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सिक्कीमच्या सुवर्ण महोत्सवी सोहळ्याच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. पर्यटन हा सिक्कीमच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार असल्याचे सांगत, पर्यटनवृद्धीसाठी कनेक्टिव्हिटी वाढवण्यावर सरकारचा भर असल्याचे मोदी यांनी नमूद केले. पश्चिम बंगालमधील बागडोगरा ते सिक्कीम दरम्यान द्रुतगती मार्ग उभारणे, गंगटोकमध्ये रिंग रोड बांधणे, तसेच नाथुला येथे द्रुतगती मार्ग विकसित करणे यांसारखे प्रकल्प हाती घेतले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय रोपवे आणि स्कायवे प्रकल्पही विचाराधीन असल्याची माहिती त्यांनी दिली.

सिक्कीमच्या जैवविविधतेचा उल्लेख करताना, येथील स्वच्छ रस्ते आणि शुद्ध हवा ही स्थानिकांच्या निसर्गसंवर्धनाच्या जाणीवेची साक्ष असल्याचे त्यांनी सांगितले. सेंद्रिय शेती आणि पर्यावरणपूरक उपक्रमांमुळे ईशान्य भारत भविष्यात शाश्वत विकासाचे केंद्र बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यात पर्यावरण-आरोग्य पर्यटनाला मोठी संधी असून त्यासाठी सुमारे १ हजार होमस्टे उभारण्याचे काम सुरू आहे. साहसी पर्यटनालाही पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले.

"देशाला धर्म आणि राजकीय आधारावर विभागण्याचे प्रयत्न सुरू असताना सिक्कीम 'एक भारत, श्रेष्ठ भारत'चे उत्तम उदाहरण आहे," असेही मोदी यांनी नमूद केले. सिक्कीमला 'पूर्वेकडील स्वर्ग' संबोधत त्यांनी पर्यटकांना राज्यातील नैसर्गिक सौंदर्य आणि ऑर्किड फुलांच्या विविधतेचा अनुभव घेण्याचे आवाहन केले.

क्रीडा क्षेत्राबाबत बोलताना, फुटबॉल आणि तिरंदाजीसारख्या खेळांमध्ये सिक्कीममधील तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक सुविधा उभारल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी काँग्रेस सरकारांवर टीका करत, सिक्कीममधील आरोग्य सेवांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप त्यांनी केला. सध्याचे सरकार दर्जेदार आणि परवडणाऱ्या आरोग्य सुविधांसाठी पायाभूत व्यवस्था मजबूत करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# धार्मिक संस्थांमध्ये अराजकता मान्य नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : धार्मिक संस्थांचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार म्हणजे अनियंत्रित स्वातंत्र्य नव्हे. अशा संस्थांमध्ये अराजकता असू शकत नाही आणि त्यांच्या कामकाजासाठी स्पष्ट कार्यपद्धती व नियम आवश्यक आहेत, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी नोंदवले. तसेच कोणतेही नियमन करताना घटनात्मक मापदंडांचे संरक्षण झाले पाहिजे, यावर न्यायालयाने भर दिला.

केरळमधील शबरीमला मंदिरासह विविध धार्मिक स्थळांवरील महिलांविषयीचे निर्बंध आणि धार्मिक स्वातंत्र्याची व्याप्ती यासंबंधीच्या याचिकांवर सुनावणी करताना नऊ न्यायाधीशांच्या घटनापीठाने ही भूमिका मांडली.

या खंडपीठात मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती बी. व्ही. नागरथना, एम. एम. सुंदरेश, अहसानुद्दीन अमानुल्ला, अरविंद कुमार, ऑगस्टीन जॉर्ज मसिह, प्रसन्ना बी. वराळे, आर. महादेवन आणि जॉयमाल्या बागची यांचा समावेश आहे. सुनावणीदरम्यान हजरत ख्वाजा निजामुद्दीन औलिया दर्ग्याशी संबंधित प्रकरणात वकील निजाम पाशा यांनी मांडणी करताना दर्गा ही संतांच्या समाधीस्थळाशी निगडित धार्मिक संस्था असल्याचे सांगितले. सुफी परंपरेत अशा स्थळांना विशेष महत्त्व दिले जाते, असेही त्यांनी नमूद केले. या वेळी न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्ला यांनी स्पष्ट केले की, व्यवस्थापनाचा अधिकार असला तरी तो कोणत्याही प्रकारच्या नियंत्रणाविना असू शकत नाही. "प्रत्येक धार्मिक संस्थेला स्वतःची कार्यपद्धती आणि नियम असले पाहिजेत. कोणीही मनमानी पद्धतीने वागू शकत नाही. नियमन आवश्यक आहे; मात्र ते घटनात्मक मर्यादांमध्येच असले पाहिजे," असे त्यांनी सांगितले. न्यायालयाने असेही नमूद केले की, धार्मिक प्रथांचे 'आवश्यक' किंवा 'अनावश्यक' स्वरूप ठरवणे कठीण असले तरी ते अशक्य नाही.

सप्टेंबर २०१८ मध्ये पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने ४:१ बहुमताने दिलेल्या निकालात १० ते ५० वयोगटातील महिलांना शबरीमला अय्यप्पा मंदिरात प्रवेशबंदी उठवून ती प्रथा घटनाबाह्य ठरवली होती. या प्रकरणाची सुनावणी सध्या सुरू आहे.

### 'आप'च्या आमदाराची ८ महिन्यांनंतर सुटका

**जम्मू** : जम्मू आणि काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाने सार्वजनिक सुरक्षा कायद्या (पीएसए) अंतर्गत असलेली अटक रद्द केल्यामुळे, 'आप'चे आमदार मेराज मलिक यांची आठ महिने तुरुंगात घालवल्यानंतर मंगळवारी कठुआ तुरुंगातून सुटका करण्यात आली. जम्मू येथील आपल्या निवासस्थानी मलिक यांचे आगमन झाले, तेव्हा पुष्पहार, ढोलकीचा गजर आणि फटाक्यांच्या आतषबाजीसह त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. मलिक यांनी लढत घेतली.

# सेन्सेक्स ४१६ अंकांनी घसरला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : जागतिक अनिश्चितता आणि कच्च्या तेलाच्या दरवाढीच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी भारतीय शेअर बाजार सुस्त राहिला. दिवसभर अस्थिर व्यवहारानंतर प्रमुख निर्देशांक किंचित घसरणीसह बंद झाले. बीएसई सेन्सेक्स ४१६ अंकांनी घसरला, तर निफ्टी ५० २४,००० या मानसिकदृष्ट्या महत्त्वाच्या पातळीखाली स्थिरावला.

मागील सत्रातील तेजीच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी नफा वसुलीला प्राधान्य दिल्याचे दिसून आले. त्यामुळे बाजारात एकत्रीकरणाचा (कन्सॉलिडेशन) कल दिसून आला. बाह्य जोखमींच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी सावध भूमिका घेतल्याचे चित्र होते. सत्राच्या सुरुवातीपासूनच नकारात्मक जागतिक संकेत आणि कच्च्या तेलाच्या किमतीतील वाढ यामुळे बाजारावर दबाव होता. भारताचे आयातीवरील अवलंबित्व लक्षात घेता, या वाढीचा गुंतवणूकदारांच्या भावनांवर परिणाम झाला. मध्य पूर्वेतील भू-राजकीय तणाव आणि ऊर्जा पुरवठ्यातील अडथळ्यांमुळे अनिश्चितता वाढली. दिवसभर निर्देशांकांनी सावरण्याचा प्रयत्न केला; मात्र सत्राच्या उत्तरार्धात विक्रीचा दबाव वाढल्याने बाजार पुन्हा घसरला. परिणामी, बाजार सपाट ते नकारात्मक पातळीवर बंद झाला.

## सरसंघचालक मोहन भागवत यांचे प्रतिपादन

# अयोध्येतील श्रीराम मंदिर सत्ताधाऱ्यांमुळेच शक्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नागपूर** : अयोध्येतील राम मंदिर हे सत्ताधाऱ्यांच्या वचनबद्धतेमुळे आणि देशभरातील जनतेच्या पाठिंब्यामुळे उभारले गेले, असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी म्हटले आहे. तसेच, भारत आधीच हिंदू राष्ट्र असल्याने त्याला हिंदू राष्ट्र म्हणून घोषित करण्याची गरज नाही, असेही ते म्हणाले.

राम मंदिराच्या बांधकामात योगदान देणाऱ्यांचा सत्कार करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात ते सोमवारी बोलत होते. संघाच्या प्रसिद्धीनुसार, नागपूरच्या रेशीमबाग येथील डॉ. हेडगेवार स्मारक समितीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

भागवत म्हणाले की, हे मंदिर भगवान रामाच्या इच्छेने उभारले गेले असून, त्याची तुलना भगवान कृष्णाने उचललेल्या गोवर्धन पर्वताशी करता येईल. अशी कृत्ये केवळ सामूहिक प्रयत्नांतूनच शक्य होतात, असेही त्यांनी नमूद केले. "ते प्रभूच्या बोटावर विसावते; पण जोपर्यंत लोक आपली लाकडे देत नाहीत, तोपर्यंत ते बोट हलत नाही. मंदिरही त्याच प्रकारे उभारले गेले," असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, सनातन धर्माच्या पुनरुत्थानासाठी भारताचे पुनरुत्थान आवश्यक आहे, ही संकल्पना सुमारे १५० वर्षांपूर्वी अरविंद घोष यांनी मांडली होती. त्यांनी नमूद केले की, पुनरुत्थानाची प्रक्रिया १८५७ पासून सुरू झाली असून प्रत्येक योगदानासोबत दैवी शक्ती या संकल्पाच्या पूर्ततेसाठी मार्गदर्शन करत आहे.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकांचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आल्यानंतर 'द गार्डियन'ने एक लेख प्रसिद्ध करून "या दिवशी भारतीयांनी अखेर ब्रिटिशांना निरोप दिला," असे म्हटले होते. "तांत्रिकदृष्ट्या आपण १५ ऑगस्ट १९४७ रोजी निरोप दिला; पण त्याची पूर्ण जाणीव नव्हती," असे त्यांनी नमूद केले.

भागवत यांनी प्रश्न उपस्थित केला की, कटिबद्ध नेतृत्व आणि राजकीय इच्छाशक्तीशिवाय राम मंदिराचे बांधकाम शक्य झाले असते का? ते म्हणाले की, रामजन्मभूमी आंदोलनाशिवाय मंदिर उभारणे शक्य नव्हते आणि हे आंदोलन अत्यंत व्यापक होते. "मंदिर उभारण्याचा निर्णय झाला होता; पण भक्कम पाया नसताना ते कसे उभे राहणार? भारतातील प्रत्येक व्यक्तीने यात योगदान दिले," असे ते म्हणाले. ते म्हणाले की, प्रभू रामाच्या 'बोटांच्या टोकाने' मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले असून राष्ट्रउभारणीची प्रक्रिया पुढेही सुरू राहील.

भागवत यांनी असेही नमूद केले की, भारत हिंदू राष्ट्र असावा या कल्पनेची पूर्वी खिल्ली उडवली जात होती; मात्र आज तेच लोक भारत ही हिंदूंची भूमी असल्याचे मान्य करत आहेत. "सूर्य पूर्वेला उगवतो, हे जाहीर करण्याची गरज नसते. त्याचप्रमाणे भारत हिंदू राष्ट्र आहे, ही आधीच वस्तुस्थिती आहे," असे ते म्हणाले. ते म्हणाले की, भारताला हिंदू राष्ट्र म्हणून घोषित करण्याची मागणी वारंवार केली जाते; मात्र जे आधीपासून अस्तित्वात आहे, ते घोषित करण्याची आवश्यकता नाही. मंदिराच्या बांधकामात योगदान देणाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता, असे त्यांनी सांगितले.